बुधवार, दि. २७ मे २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक २६५ वा ● किंमत २ रु. ● पाने ०४
8390098886 | yuva.aadarsh@gmail.com | 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ | https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ | https://twitter.com/Yuva_aadarshjln/ | RNI: MAHMAR/2019/78282

## इंधन टंचाई; 'झालमुडी-चॉकलेट' वाटून काँग्रेसचे अनोखे आंदोलन

### जनता रांगेत... आणि सत्ताधारी मेजवानीत! मोदी सरकार विरोधात घोषणाबाजी

**जालना । प्रतिनिधी -** इंधन टंचाई, वाढते दर आणि पेट्रोल पंपांवरील लांबच लांब रांगांमुळे हैराण झालेल्या जनतेच्या प्रश्नांवर काँग्रेस पक्षाने आज मंगळवारी जालन्यात अनोख्या आणि तितक्याच आक्रमक शैलीत आंदोलन छेडले. बसस्थानका जवळील भारत पेट्रोल पंपासमोर काँग्रेस पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी नागरिकांना झालमुडी आणि मेलडी चॉकलेट वाटप करत केंद्र सरकारच्या धोरणांचा जोरदार निषेध करत अनोखे आंदोलन केले. काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष कल्याण दळे आणि जालना महानगर शहर जिल्हाध्यक्ष डॉ. विशाल धानुरे यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या आंदोलनात मोदी सरकार विरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. शेतकरी रांगेत... सरकार परदेश दौऱ्यात!, डिझेल नाही, पण जाहिराती भारी!, जनतेला टंचाई... सत्तेला मलाई!वारे मोदी तेरा खेल सस्ती दारू महंगा तेल..अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला.

यावेळी बोलतांना काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष कल्याण दळे यांनी केंद्र सरकारवर सडकून टीका केली. इंधन दरवाढीने सर्वसामान्यांचे कंबरडे मोडले आहे. खरीप हंगामाच्या तोंडावर शेतकरी डिझेलसाठी उन्हात रांगा लावत आहे, तर पंतप्रधान परदेश दौऱ्यांमध्ये व्यस्त आहेत. देशात एवढी भीषण इंधन टंचाई यापूर्वी कधीच झाली नव्हती, असा घणाघात त्यांनी केला.

शहर जिल्हाध्यक्ष डॉ. विशाल धानुरे यांनीही सरकारवर निशाणा साधतांना म्हटले की, जनता त्रस्त आहे, पण सरकार संवेदनाहीन झाले आहे. पेट्रोल-डिझेलच्या वाढत्या दरांमुळे कामगार, शेतकरी आणि मध्यमवर्गीयांचे जगणे कठीण झाले आहे. म्हणूनच आज आम्ही जनतेला झालमुडी आणि मेलडी चॉकलेट वाटत सरकारचा निषेध करत आहोत.

या आंदोलनात ज्येष्ठ



नेते राजेंद्र राख,अल्पसंख्यांक विभागाचे जिल्हाध्यक्ष बदर चाऊस, इकबाल कुरेशी, बासेद कुरेशी, संजय मुथा, राजेंद्र गोरे, संजय इंगळे, कृष्णा पडूळ, अजय बनकर, जफर मिर्झा, नारायण वाडेकर, कल्याणराव तारडे, बाबासाहेब सोनवणे, दिनेश सुराणा, वसीम शेख, रघुवीर गुडे, सुरज यलगंटवार, गौतम लांडगे, हाजी असिम मोमीन, युनूस हुसेन शेख, चंद्रकांत रत्नपारखी, योगेश कदम, दिग्विजय दांडगे, दिलीप चव्हाण,अमोल राठोड,शिवाजी लोखंडे, जय जाधव, जनार्दन चव्हाण यांच्यासह काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. इंधन दरवाढ आणि टंचाई तातडीने दूर झाली नाही, तर काँग्रेस रस्त्यावर उतरून आणखी तीव्र आंदोलन छेडेल, असा इशाराही यावेळी देण्यात आला.

## वाढत्या पेट्रोल व डिझेल दरवाढीवर तातडीने उपाययोजना करा - डॉ. कल्याण काळे

**जालना । प्रतिनिधी -** खासदार डॉ. कल्याण काळे यांनी आज मा. जिल्हाधिकारी, जालना यांना निवेदन देऊन वाढत्या पेट्रोल व डिझेल दरवाढीबाबत शासन स्तरावर तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली.

सध्या देशासह महाराष्ट्र राज्यात पेट्रोल व डिझेलच्या किमतीमध्ये सातत्याने वाढ होत असून त्याचा मोठा आर्थिक फटका सर्वसामान्य नागरिक, शेतकरी, व्यापारी, वाहतूकदार तसेच लघुउद्योगांना बसत आहे. जालना जिल्ह्यातील ग्रामीण व शहरी भागातील नागरिकांचे दैनंदिन जीवन इंधन दरवाढीमुळे अधिक कठीण झाले असल्याचे खासदार डॉ. कल्याण काळे यांनी निवेदनात नमूद केले आहे.

जिल्ह्यातील बहुतांश नागरिक शेती व्यवसायावर अवलंबून असून शेती मशागतीची कामे, सिंचनासाठी वापरण्यात येणारे पंप, ट्रॅक्टर तसेच मालवाहतूक ही मोठ्या प्रमाणावर डिझेलवर आधारित आहे. डिझेलच्या वाढत्या किमतीमुळे शेती उत्पादन खर्चात मोठी वाढ झाली असून त्याचा थेट परिणाम शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीवर होत आहे. तसेच पेट्रोलच्या वाढत्या दरांमुळे दुचाकीधारक, नोकरदार वर्ग, विद्यार्थी व लघु व्यावसायिकांनाही आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे.

मागील दहा दिवसांत पेट्रोल व डिझेलच्या दरात अनेक वेळा वाढ करण्यात आली असून १५ मे रोजी ३ रुपये, १९ मे रोजी ०.९० पैसे, २३ मे रोजी पेट्रोलसाठी ०.८७ पैसे व डिझेलसाठी ०.९१ पैसे तसेच २५ मे रोजी पेट्रोल २.६१ रुपये व डिझेल २.७१ रुपयांनी वाढविण्यात आले. त्यामुळे मागील दहा दिवसांत पेट्रोलमध्ये ७.३८ रुपये तर डिझेलमध्ये ७.५२ रुपयांची एकूण वाढ झाल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले.



इंधन दरवाढीमुळे वाहतूक खर्च वाढून जीवनावश्यक वस्तूंच्या किमतीतही वाढ होत असून महागाईला चालना मिळत आहे. ग्रामीण भागात सार्वजनिक वाहतूक व्यवस्था मर्यादित असल्याने नागरिकांना खासगी वाहनांचा वापर करावा लागत असून इंधन दरवाढीचा फटका अधिक तीव्रतेने बसत असल्याचेही त्यांनी नमूद केले.

जालना जिल्हा हा औद्योगिक तसेच कृषीप्रधान जिल्हा असल्याने इंधन दरवाढीचा परिणाम उद्योग, व्यापार व कृषी क्षेत्रावर मोठ्या प्रमाणात होत आहे. वाढत्या वाहतूक खर्चामुळे बाजारपेठेतील व्यवहारांवरही विपरीत परिणाम होत असून आर्थिक चक्र मंदावण्याची परिस्थिती निर्माण होत असल्याची चिंता खासदार डॉ. कल्याण काळे यांनी व्यक्त केली.

सर्वसामान्य नागरिकांना दिलासा मिळावा यासाठी पेट्रोल व डिझेलवरील करामध्ये सवलत देण्याबाबत शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात यावा तसेच जिल्हा प्रशासनामार्फत नागरिकांच्या अडचणी शासनाच्या निदर्शनास आणून देण्यात याव्यात, अशी मागणी खासदार डॉ. कल्याण काळे यांनी केली आहे. सदरील निवेदन हे जिल्हा काँग्रेस कमिटी तर्फे श्री. कल्याण दळे, श्री. राजेंद्र राख, बदर भाई चाऊस, शहराध्यक्ष डॉ. विशाल धानोरे, इकबाल कुरेशी, बाशीत कुरेशी, संजय मुथा, संजय इंगळे, कृष्णा पडूळ, अजय बनकर, शेख इब्राहिम, नारायण वाढेकर, कल्याण तारडे, राजेंद्र गोरे, बाबासाहेब (पान २ वर)

## औरंगाबाद-जालना स्थानिक प्राधिकारी निवडणूक; जिल्ह्यात मनाई आदेश जारी

**छत्रपती संभाजीनगर - प्रतिनिधी**
औरंगाबाद-जालना स्थानिक प्राधिकारी निवडणूक सुरळीत, निष्पक्ष, निर्भय आणि पारदर्शक वातावरणात पार पाडण्यासाठी जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात १८ मे २०२६ ते २५ जून २०२६ रोजी मतदान प्रक्रिया संपेपर्यंत मनाई आदेश जारी केले आहेत. या आदेशानुसार, निवडणूक आयोगाने प्राधिकृत केलेले अधिकारी-कर्मचारी आणि मतदानासाठी रांगेत उभे असलेले मतदार वगळता, जिल्ह्यात पाच किंवा पाच पेक्षा अधिक लोकांना एकत्र येण्यास सक्त मनाई करण्यात आली आहे. मतदान केंद्राच्या १०० मीटर परिसरात हे नियम पाळावे लागणार असून

निवडणुकीची गोपनीयता आणि सुरक्षितता राखण्यासाठी मतदान केंद्राच्या १०० मीटर परिसरात कोणत्याही व्यक्तीला, तसेच मतदान केंद्रातील मतदान प्रतिनिधींना मोबाईल फोन, कॉर्डलेस फोन, मेगा फोन, मायक्रोफोन किंवा वायरलेस सेट वापरण्यास आणि फोटो काढण्यास सक्त मनाई असेल.

बंदोबस्तासाठी नेमलेले पोलीस अधिकारी व कर्मचारी वगळून इतर कोणत्याही व्यक्तीला कोणत्याही प्रकारची शस्त्रे बाळगता येणार नाहीत. तसेच, केवळ परवानगी दिलेल्या वाहनांनाच या परिसरात प्रवेश मिळेल. मतदान केंद्र परिसरात निवडणूक विषयक प्रचार करणे, मतदारांना धमकावणे किंवा ठराविक उमेदवारालाच मतदान करण्यासाठी दबाव टाकण्यास पूर्ण मनाई आहे.

ज्वलनशील पदार्थ, स्फोटक साहित्य किंवा मनुष्य आणि मतदान यंत्राला () हानी पोहोचवू शकेल अशी कोणतीही वस्तू नेण्यावर बंदी घालण्यात आली आहे.

## परतुर शहरात सीबीएससी अभ्यासक्रमाचे लालूच दाखवून पालकांची लूट

### प्रत्यक्षात शाळांना मान्यता नाही

**परतुर । प्रतिनिधी -** परतुर शहरामध्ये जवळपास ३५ इंग्रजी माध्यमांच्या शाळा आहेत. या शाळांमध्ये फक्त एका शाळेला सीबीएससी ची मान्यता आहे व दुसऱ्या एका शाळेला सीबीएससी ची मान्यता यावर्षी मिळाली आहे. हे सर्व सत्य आहे परंतु बाकीच्या राहिलेल्या इंग्रजी माध्यमाच्या शाळांना महाराष्ट्र शासनाची परवानगी असताना देखील या शाळा इयत्ता पहिली ते आठवीपर्यंत कुठल्यातरी खाजगी अभ्यासक्रमांची पुस्तके शाळेमध्ये पालकांना घेण्यासाठी जबरदस्ती करत आहेत. महाराष्ट्र शासनाचा असा अधिनियम आहे की, ज्या शाळांनी महाराष्ट्र सरकारची परवानगी आहे त्यांनी सीबीएससी माध्यमाचा पाठ्यक्रम घेऊ नये .अशा बाबतीत चे परिपत्रक देखील महाराष्ट्र शासनाने काढले आहे .परंतु महाराष्ट्र शासनाच्या परिपत्रकाला केराची टोपली दाखवण्याची काम या संस्थाचालकाने केले आहे .कारण यामध्ये संस्थाचालकांना फार मोठे कमिशन मिळत आहे. शासनाच्या परिपत्रकानुसार या शाळांनी महाराष्ट्र शासनाचा इंग्रजी माध्यमाचा अभ्यासक्रम व पाठ्यपुस्तके वापरायला पाहिजे आहेत. असे शासनाच्या जीआर मध्ये नमूद केले आहेत तसेच ज्या वेळेस खात्याची मान्यता मंडळ मान्यता घेताना देखील स्टॅम्प पेपर वरती सर्व संस्थाचालकांनी लिहून दिले आहे. त्यानंतरच या शाळांना शासनाने परवानगी दिली आहे .याचप्रमाणे भारत देशातील सर्व सीबीएससी माध्यमांच्या शाळांनी फक्त एनसीईआरटी म्हणजेच भारत सरकारची पुस्तके शाळांनी वापरायला पाहिजेत, परंतु जास्त कमिशन मिळवण्यासाठी या शाळा पालकांना जबरदस्तीने इतर प्रायव्हेट कंपन्यांची पुस्तके घेण्यासाठी जबरदस्ती करत आहेत .जर आपल्या शाळेला महाराष्ट्र शासनाची परवानगी असेल तर इयत्ता पहिली ते आठवीपर्यंत ह्या शाळा सीबीएससी पॅटर्नच्या नावाखाली पालकांची लूटमार करत आहेत. या सर्व बाबींकडे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री देवेंद्रजी फडणवीस साहेब व शिक्षण मंत्री माननीय श्री दादासाहेब भुसे यांनी लक्ष देण्याची फार फार गरज आहे. परतूर शहरातील गटशिक्षणाधिकारी, पंचायत समितीचे बीडीओ, तहसीलदार ,उपविभागीय अधिकारी ,केंद्रप्रमुख मुग घेऊन का गप्प आहेत.? या सर्व परतुर शहरातील शाळांची तपासणी करण्याची मागणी पालक वर्गाकडून होत आहे. इंग्रजी माध्यमातील शाळेतील कोणत्याही मुख्याध्यापकाला शिक्षकाला कुठल्याही प्रकारची शासनाने दिलेले

(पान २ वर)

### जनगणना २०२७ अंतर्गत दिल्ली येथील महारजिस्ट्रार कार्यालयाच्या पथकाची जालना जिल्ह्यास भेट

## दिल्ली येथील पथकाकडून जालना जिल्ह्यातील जनगणनेच्या कामकाजाचे कौतुक





**जालना । प्रतिनिधी -** जनगणना २०२७ अंतर्गत दि. १६ मे ते १४ जून, २०२६ या कालावधीत महाराष्ट्रात घरसूचीकरण व घरगणना यादी ( ) कार्यक्रम हाती घेण्यात आलेला आहे. या कार्यक्रमाची पाहणी करण्यासाठी दिल्ली येथील केंद्र शासनाच्या जनगणना कार्यालयाचे अतिरिक्त महानिबंधक संजीव कुमार, आणि उपसंचालक (...) संदिप राय हे (दि. २६ मे) आजरोजी जालना जिल्हा दौऱ्यावर आले असता, त्यांनी जालना तालुक्यातील मौजे धारकल्याण, बदनापूर नगर पंचायत, बदनापूर तालुक्यातील मौजे शेलगाव, तसेच जालना शहर महानगर पालिकेच्या हद्दीतील जांगडानगर (ढवळेश्वर) येथे प्रत्यक्ष भेटी देऊन सुरु असलेल्या जनगणनेच्या कामकाजाचा आढावा घेतला.

तसेच जिल्हाधिकारी कार्यालय जालना येथे स्थापन करण्यात आलेल्या जनगणना कक्षास भेट देऊन सर्व अधिकारी /कर्मचारी यांची बैठक घेवून जनगणनेच्या कामाबाबत महत्वाच्या सूचना देत मार्गदर्शन केले. जिल्ह्याच्या प्रधान जनगणना अधिकारी तथा जिल्हाधिकारी आशिमा मित्तल, निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा जनगणना अधिकारी शशिकांत हदगल यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यात सुरु असलेल्या जनगणनेच्या कामकाजाबाबत दिल्ली येथील पथकाने कौतुक करून समाधान व्यक्त केले.

## बिडी कामगारांची उपासमार थांबवा; कामगार विरोधी अधिकाऱ्यांची हकालपट्टी करा

### इंटक कामगार संघटनेची मागणी

**जालना । प्रतिनिधी -** जालना येथील मंजुर छाप बिडी कारखानदारांने बिडी कामगार महिलांकडून कामे करुन घेतली आणि त्यांची ७ महिन्यांची मजुरी रोखून धरली. पुन्हा चालू असलेले काम बंद करुन त्यांची पिळवणुक सुरु करुन उपासमारीला भाग पाडत असल्याने इंटक कामगार संघटनेसह कामगारांनी जिल्हाधिकारी असिमा मित्तल यांची भेट घेवून कामगार विरोधी अधिकाऱ्यांची हकालपट्टी करण्यात येवून कामगारांना देण्यात यावा, अशी मागणी निवेदनाव्दारे केली.

जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, गेल्या पंधरा दिवसांपासून कारखाना बंद आहे त्यामुळे कामगारांच्या हाताला काम नाही तसेच हक्काची मजुरी रोखून धरल्याने सदरील कामगारांवर उपासमारीची वेळ आली आहे.

यावेळी इंटक संघटनेचे अध्यक्ष डॉ. राधेश्याम जायस्वाल, साईआन्ना चिलवर, पुष्पाबाई गरदास, सुनिता हट्टेकर, लक्ष्मीबाई बल्लेवार, मनिषा शेरला, तुळशाबाई चिप्पा, रत्नमाला गुरला, अनिता श्रीपत, संगीता गुल्लापेल्ली, राधाबाई टिपरास, उमाबाई श्रीपत, विजया टिपरास, पुजा श्रीपतसह अनेक बिडी कामगार महिला यावेळी उपस्थित होत्या.

## संपादकीय पान

# जामिनाचा घटनात्मक तिढा

कायदेशीर पवित्रा जरी योग्य असला, तरी यामुळे एक घटनात्मक विरोधाभास निर्माण झाला आहे. एकीकडे कलम २१ नुसार जामीन हा अधिकार मानला गेला आहे, तर दुसरीकडे यूएपीए आणि पीएमएलए कायद्यांतील तरतुदींनी या अधिकाराला वैधानिकरीत्या रोखून धरले आहे. आता न्यायालयाला या दोन्हीच्या सुवर्णमध्यावर विचार करावा लागणार आहे. सहसा सर्वोच्च न्यायालयातील दैनंदिन कायदेशीर चर्चांकडे सर्वसामान्यांचे लक्ष कमीच असते. जेव्हा देशाला घोर संकटात लोटणारा एखादा संवेदनशील मुद्दा समोर येतो, तेव्हाच संपूर्ण देशाचे लक्ष सर्वोच्च न्यायालयाच्या सुनावणीकडे आणि निकालाकडे लागते. अशाच एका अत्यंत महत्त्वाच्या कायदेशीर मुद्द्यावर सर्वोच्च न्यायालयाने नुकतीच गंभीर चर्चा घडवून आणली. जामीन हा नियम आणि तुरुंगवास हा अपवाद ही केवळ सहज दिलेली घोषणा नसून ती कायद्यातील वस्तुस्थिती आहे, असा महत्त्वपूर्ण निष्कर्ष न्यायालयाने काढला आहे. सर्वोच्च न्यायालयाचे हे निरीक्षण नक्कीच विचार करायला लावणारे आहे. खटल्याच्या सुनावणीला अवाजवी विलंब झाल्यास आरोपीला जामीन दिला जाऊ शकतो का, हा मुख्य सवाल या चर्चेच्या केंद्रस्थानी होता. यावर केंद्र सरकारची भूमिका अत्यंत आक्रमक होती. अजमल कसाब आणि हाफिज सईद यांसारख्या प्रकरणांमध्ये जर सुनावणीला प्रचंड विलंब झाला असता, तर त्यांनाही जामीन देता आला असता का, असा थेट प्रश्न केंद्राने उपस्थित केला. दंगली आणि दहशतवादासारख्या गंभीर प्रकरणांमधील गुन्ह्यांचे गांभीर्य कोणत्याही परिस्थितीत नजरेआड करता येणार नाही, असा युक्तिवाद केंद्र सरकारने केला.

: प्लेऑफमध्ये विराट पुन्हा ठरणार फ्लॉप? आकडे पाहून चाहत्यांची वाढली धाकधूक...

: आयपीएल २०२६ च्या पहिल्या क्वालिफायरमध्ये आज रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू आणि गुजरात टायटन्स यांच्यात लढत होणार आहे. अंतिम फेरीत थेट प्रवेश ...

कायद्याचे मूलभूत तत्त्व असे सांगते की, शंभर अपराधी सुटले तरी चालतील, पण एकाही निरपराधाला शिक्षा होता कामा नये. मात्र, केंद्र सरकारचा युक्तिवाद असा आहे की, यूएपीए आणि पीएमएलए यांसारख्या विशेष कायद्यांतर्गत येणाऱ्या प्रकरणांकडे सामान्य गुन्ह्यांप्रमाणे पाहता येणार नाही. अशा प्रकरणांमध्ये गुन्ह्याचे गांभीर्य, आरोपीची प्रत्यक्ष भूमिका आणि कोणत्या कारणांमुळे खटला प्रलंबित राहिला, याची सखोल तपासणी करणे गरजेचे आहे. सर्वोच्च न्यायालयाने यावर विस्तृत चर्चा केली असून, आता हा तिढा सोडवण्यासाठी एका मोठ्या खंडपीठाकडे हे प्रकरण सोपवणे योग्य ठरेल, जेणेकरून सर्व बाजूंनी विचार करून अंतिम निर्णय घेता येईल. अनेक प्रकरणांमध्ये आरोपी दीर्घकाळ तुरुंगात राहिल्यानंतर शेवटी त्याची निर्दोष मुक्तता झाल्याची उदाहरणेही घडली आहेत. दहशतवाद आणि फुटीरतावादी कृत्यांविरुद्ध संसदेने जाणीवपूर्वक कडक कायदे केले आहेत; त्यामुळे अशा गुन्ह्यांमध्ये बेल हा नियम लागू होत नाही, असा एक मोठा प्रवाह आहे. येथे सर्वोच्च न्यायालय आणि केंद्र सरकार यांच्यातील कायदेशीर श्रेष्ठत्वाचा मुद्दाही अधोरेखित होतो. या विषयात विविध पातळीवर विरोधाभास जाणवत असल्याने, न्यायालयाने हे प्रकरण मोठ्या खंडपीठाकडे सोपवण्याचा घेतलेला पवित्रा अत्यंत महत्त्वाचा आहे.

: अर्शदीप सिंगने इंस्टाग्रामवरून २०० हून अधिक पोस्ट का हटवल्या? नेमकं काय घडलं?

नवी दिल्ली : भारतीय संघ आणि पंजाब किंग्सचा वेगवान गोलंदाज अर्शदीप सिंग ( ) सध्या त्याच्या कामगिरीपेक्षा सोशल मीडियावरील हालचालींमुळे जास्त ...

न्यायमूर्ती बी. व्ही. नागरत्ना यांनी जामीन हा नियम असला पाहिजे यावर भर दिला होता, तर दुसरीकडे प्रखर दहशतवादी आणि विघातक कृत्यांमध्ये सामील असलेल्या घटकांसाठी हा नियम सरसकट लागू करता येणार नाही, असा केंद्राचा स्पष्ट युक्तिवाद आहे. न्यायालयाच्या या अंतिम निष्कर्षाचे दूरगामी परिणाम भारतीय न्यायव्यवस्थेवर होऊ शकतात. काही न्यायालयीन निवाड्यांवर गंभीर आक्षेप नोंदवले गेल्यामुळेच न्यायालयाने ही कोंडी फोडण्यासाठी हे प्रकरण मोठ्या खंडपीठाकडे सोपवणे अधिक सुरक्षित आणि खात्रीचे मानले आहे. परंतु, या संपूर्ण प्रक्रियेत सर्वात महत्त्वाचा मुद्दा येतो तो म्हणजे राष्ट्रीय सुरक्षा. ज्या प्रकरणांमुळे देशाची सुरक्षा आणि सार्वभौमत्व धोक्यात येते, त्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. अजमल कसाबच्या प्रकरणातही हाच मुद्दा चर्चिला गेला होता. मात्र, कसाब हा थेट देशावर हल्ला करणारा परकीय शत्रू होता, त्यामुळे त्याच्या बाबतीत या नियमाचा संबंधच येत नव्हता. देशाविरोधात युद्ध पुकारणाऱ्यांना हा नियम लागू करू नये, असे एका पक्षाचे मत आहे. जे छोटे-मोठे गुन्हेगार तुरुंगात खितपत पडले आहेत आणि ज्यांच्यापासून देशाला कोणताही मोठा धोका नाही, त्यांच्यासाठी बेल इज द रूल हा नियम योग्य ठरतो. मात्र, अतिरेकी आणि राष्ट्रविरोधी कृत्यांसाठी वेगळे मापदंड लावणे गरजेचे ठरते. सावंतवाडी रेल्वे स्थानकाला मधु दंडवते यांचे नाव  मंत्रिमंडळ बैठकीत निर्णय; शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांना मुदतवाढ मुंबई : कोकण रेल्वेचे शिल्पकार आणि देशाचे माजी रेल्वे मंत्री ज्येष्ठ नेते स्व. ... संविधानाच्या कलम २१ नुसार प्रत्येक नागरिकाला वैयक्तिक स्वातंत्र्य आणि सन्मानाने जीवन जगण्याचा मूलभूत हक्क दिला आहे. मात्र, हा नियम कसाब किंवा शारजील इमाम आणि उमर खालिद यांसारख्या आरोपींना लागू करता येणार नाही, अशी केंद्र सरकारची ठाम भूमिका आहे. सर्वोच्च न्यायालयाने जानेवारी महिन्यात उमर खालिद आणि शारजील इमाम यांना खालच्या न्यायालयाने जामीन नाकारल्याबद्दल काही गंभीर आक्षेप नोंदवले होते.

# सरकारच्या चुकीच्या धोरणाला कॉकरोच डंक मारणार का?

आता कॉकरोचचे वादळ थांबायचे नाय!देश विकासाच्या प्रगतीचे पथावर आहे ही बाब सत्य आहे,तरीही देशात बेरोजगारी,कुपोषण,भुकमरी,शेतकऱ्यांच्या आत्महत्यां, बेरोजगारांच्या समस्या,शिक्षण क्षेत्रातील भ्रष्टाचार आणि इतर क्षेत्रातील भ्रष्टाचार या सारख्या गंभीर समस्या आजही देशात घर करून बसल्या आहेत.कारण वाढल्या भ्रष्टाचाराने देशाला पोखरून टाकले आहे. वाढती बेरोजगारी व महागाईचा कळस यात बेरोजगार तरूण भरडल्या जात आहे आणि आता बेरोजगारांची तुलना कॉकरोच सोबत करून बेरोजगारांच्या जखमेवर मीठ चोळन्याचे काम सरन्यायाधीशांनी केले.त्यामुळे याचे पडसाद संपूर्ण देशभर व देशाच्या बाहेर सुद्धा उमटतांना दिसत आहे. आज देशातील वाढत्या बेरोजगारीमुळे युवा वर्ग त्रस्त आहे आणि यात महागाईने मोठी भर टाकुन देशाच्या युवावर्गासोबतच देशाच्या १४० कोटी जनतेला व्दीधेमध्ये टाकले. सरकारने स्वतःच्या स्वार्थासाठी अनेक मोफत सुविधा अंमलात आणुन आम जनतेच्या खिशाला मोठी कात्री लावली आहे व देशाची अर्थव्यवस्था चौपट झाल्याचे दिसून येते.यामुळे देशात शेतकरी वर्ग, बेरोजगार युवक,आम जनता अत्यंत त्रस्त आहे.कारण सरकारने लावलेली मोफत सुविधा याची संपूर्ण झळ महागाईच्या रूपात देशाच्या गरीब भोळ्याभाबड्या जनतेला भोगावी लागते आहे.मुख्य न्यायाधीश सूर्यकांत यांनी एका सुनावणी दरम्यान देशातील बेरोजगार तरूणांना झुरळ (कॉकरोच) म्हटले.ते म्हणाले की, काही बेरोजगार तरूण झुरळांसारखे (कॉकरोच सारखे) असतात,जे नंतर मीडिया, सोशल मीडिया किंवा आरटीआय कार्यकर्ते बनून व्यवस्थापनेवर हल्ला करू लागतात.या त्यांच्या वक्तव्याने देशातच नाही तर संपूर्ण जगभरात सोशल मीडियाच्या माध्यमातून खळबळ उडाली.शेवटी सरन्यायाधीशांनी म्हटले की, माझ्या वक्तव्याचा विपर्यास लावला.ही बाब आम्हीही समजु शकतो किंवा सत्य राहु शकते यात दुमत नाही.परंतु झुरळ (कॉकरोच) या शब्दने देशातील संपूर्ण बेरोजगार तरूणांनवर एवढा मोठा घाव केला की,तो भरून निघने शक्य नाही.कारण देशात आपण ताजे नीट पेपर लिक प्रकरण पहाले यात २५ हजार युवकांना त्याची झळ सोसावी लागत आहे व त्यांची मनःस्थिती विस्कळीत झाली आहे आणि चार ते पाच युवकांनी या प्रकरणाला कंटाळून आत्महत्या सुध्दा केल्याचे दिसून येते.म्हणजे तरूणांच्या डोळ्यासमोर शिक्षण प्रणालीची खुली हत्या होत आहे, त्याचप्रमाणे शिक्षण क्षेत्रात मोठ्या प्रमाणात लुट आताही सुरूच आहे, देशात करोडोंचे प्रोजेक्ट आल्याचे मिडियाच्या माध्यमातून सरकार कडून सांगितले जाते परंतु बेरोजगारांना अजुनही रोजगार उपलब्ध झालेला नाही, आज देशातील प्रत्येक जिल्ह्यातील किंवा शहरातील युवकांना त्यांच्या स्थानिक ठिकाणी रोजगार उपलब्ध नसल्याने आपला परिवार सोडून मुंबई,बंगलोर,पुणे,हैदराबाद,अहमदाबाद इत्यादी अनेक ठरावीक ठिकाणी रोजगारासाठी युवा वर्ग जातांना दिसतो.परंतु देशातील अनेक राज्यात स्थानिक पातळीवर पाहिजे त्याप्रमाणात रोजगार सरकार उपलब्ध करून देवू शकली नाही ही देशाची शोकांतिका आहे.त्यामुळे काही युवावर्ग पुणे, मुंबई, हैदराबाद, बंगलोर, अहमदाबाद अशा नामांकित ठीकाणी धाव घेतांना दिसतात.अशा ठिकाणी त्यांना रोजगार मिळाला तर ठीक आहे अन्यथा हताश होऊन आत्महत्या होतांना सुध्दा आपण पहिले आहे. अशा परिस्थितीत देशाचे उच्च पदस्थ अधिकारी बेरोजगारांची तुलना ''कॉकरोच''सोबत करीत




असेल तर हे स्वतंत्र भारताचे दुर्भाग्य म्हणावे लागेल. सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी १५ मे २०२६ रोजी सर्वोच्च न्यायालयात एका खटल्याची सुनावणी करताना बेरोजगार तरुणांची तुलना झुरळांशी (कॉक्रोच) केली होती. वरिष्ठ वकील दर्जा मिळवण्याच्या याचिकेवर सुनावणी सुरू असताना, ''काही बेरोजगार तरुण झुरळांसारखे असतात, जे नंतर मीडिया, सोशल मीडिया किंवा आरटीआय कार्यकर्ते बनून व्यवस्थेवर हल्ला करू लागतात,'' असे ते म्हणाले होते. या वक्तव्यामुळेच देशभरात मोठे वादळ निर्माण झाले. यावर प्रतिक्रिया उमटत असताना, सरन्यायाधीशांनी नंतर स्पष्टीकरण दिले की, त्यांचे हे वक्तव्य भारतातील सर्वसामान्य तरुणांविषयी नसून, बनावट पदव्या असलेल्या आणि समाजमाध्यमांवरून विनाकारण यंत्रणेला लक्ष्य करणाऱ्या विशिष्ट घटकाबाबत होते. हीबाब ठीक आहे व सत्य राहु शकते.परंतु कॉकरोच या शब्दरचनेमुळे युवकांमध्ये एक जागृता निर्माण झाली आहे आणि कॉकरोचचा झुंड ( युवावर्ग) एकत्र झाला तर सरकारची मनमानी आणि भ्रष्टाचार बंद झाल्याशिवाय रहाणार नाही.आज देशाच्या प्रत्येक बेरोजगार तरूणांच्या मनात राजकीय पुढाऱ्यांन विषयीं व्देशभावना दिसून येते कारण आजी-माजी लोकप्रतिनिधी-जनप्रतिनिधी यांचे वेतन,भत्ते, पेंशन,गाडी, बंगला, मोठ्या प्रमाणात करोडों रूपयांची चलअचल संपत्ती ही बाब नेहमी काळजात खुपत असते.कारण हे लोकप्रतिनिधी पाच वर्षांत करोडपती होतात. लोकप्रतिनिधी-जनप्रतिनिधी हा देशाची जनतेची सेवा करण्यासाठी निवडून दिलेला प्रतिनिधि असतो. परंतु देशसेवा व जनसेवेला पाठ दाखवून स्वतःच्या सेवेत जास्त मग्न असतो आणि तेथुनच भ्रष्टाचाराचा उगम होतो.आज याच राजकीय पुढाऱ्यांमुळे देशाच्या सरकारी शाळा बंद होण्याच्या मार्गावर आहेत.कारण याच राजकीय पुढाऱ्यांनी आपली मोठमोठी शाळा-महाविद्यालये खोलुन व्यवसाय थाटला आहे आणि आपल्या मुलांना शिक्षणासाठी विदेशात पाठवितात.यावरून स्पष्ट होते की, देशाच्या राजकीय पुढाऱ्यांनी स्वतःच्या स्वार्थासाठी देशाच्या शिक्षण व्यवस्थेला पोखरून टाकले आहे. त्यामुळे खरोखरच देशाला कॉकरोचची गरज आहे असे मला वाटते.कदाचित सरन्यायाधीशांना वाटले असावे की, युवा क्रांती व्हावी आणि तोच शब्द त्यांच्या तोंडून निघावा ही एक बेरोजगार तरूणांनसाठी टर्निंग पॉईंट असु शकतो आणि आता खरोखरच देशातील युवा बेरोजगार वर्ग एकत्र येण्याची खरी वेळ आली आहे.अमेरिका-इजरायल-इराण युध्दाला सुरुवात २८ फेब्रुवारी २०२६ ला सुरूवात झाली आणि या काळात देशातील पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुका सुध्दा झाल्यात,मंत्री, प्रधानमंत्री,राज्यांचे मुख्यमंत्री,विरोधी पक्ष नेते इत्यादी संपुर्ण राजकीय फौजफाटा पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकीमध्ये दोन महिने प्रचारात व्यस्त होता.या काळात करोडो लिटर पेट्रोल-डिझेलचा वापर झाला आणि मोठ्या देशाचा पैसा खर्च झाला तेव्हा पेट्रोल-डिझेल भाव एक पैसाही वाढला नाही व अर्थव्यवस्थेवर काहीच झळ पोहोचली नाही आणि आता युद्ध थांबता बरोबर व विधानसभा निवडणुका संपल्या बरोबर पेट्रोल-डिझेलचे भाव दहा दिवसांत चार वेळा वाढविण्यात आले हि गंभीर बाब आहे.कारण पेट्रोल -डिझेलमुळे सरकारला ७७ हजार कोटींचा नफा असुनही पेट्रोल-डिझेलचे चौथ्यांदा भाव वाढने ही देशासाठी धोक्याची घंटा आहे आणि सरकार सांगते की,देशाची अर्थव्यवस्था सुधारण्यासाठी आपण हे भाववाढ करीत असल्याचे सरकार मार्फत सांगितले जात आहे.सरकार भाव वाढीचे कारण आंतरराष्ट्रीय आयात-निर्यातचे कारण सांगत आहेत.ही तर देशाची व देशाच्या युवावर्गाची फसवेगिरीच म्हणावी लागेल. सरकार खोटी आश्वासने देऊन बेरोजगार तरूणांनच्या जखमेवर मीठ चोळन्याचे काम करीत आहेत.त्यामुळे कॉकरोच आता सरकारला सुखाची झोप कदापि घेऊ देणार नाही.कारण आज कॉकरोच सोबत, शेतकरी वर्ग,देशातील सर्वसामान्य वर्ग,कामगार वर्ग,मजुर वर्ग एकत्र येत आहे. त्यामुळे आता सरकारला युवा बेरोजगारांना न्याय द्यावाच लागेल अन्यथा कॉकरोच (झुरळ) त्यांचे सर्वांचे गड उध्दवस्त करतील.कॉकरोच या विधानानंतर सोशल मीडियावर कॉक्रोच जनता पार्टी नावाची एक ऑनलाइन चळवळही सुरू झाली आहे आणि याला करोडो फालोअर आपली पसंती दाखवीत आहे.कारण सरन्यायाधीश सूर्यकांत म्हणतात की,''काही बेरोजगार तरुण झुरळांसारखे (कॉकरोच सारखे) असतात.हे सरन्यायाधीशांचे वक्तव्य देशाच्या बेरोजगार तरूणांच्या जिव्हारी लागले आहेत.त्यामुळे बेरोजगारांमध्ये मोठ्या प्रमाणात आक्रोश वाढला असून युवा क्रांती निर्माण होण्याची दाट शक्यता आहे.आपल्या देशात राजकीय वर्तुळात प्रथा आहे की,पहीले काहीही बोलून देणे आणि नंतर माफी मागणे किंवा माझा तो उद्देश नव्हता असे बोलून पळवाटा काढणे तेच काम माननीय सरन्यायाधीशांनी केल्याचे दिसून येते.असो जे होते ते चांगल्यासाठीच होते आणि हा तरूणांनसाठी एक चांगला टर्निंग पॉईंट राहावा असे मला वाटते.जय हिंद.

**रमेश कृष्णराव लांजेवार**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

## घृष्णेश्वर मंदिर परिसरातील सुविधा बांधकामास राष्ट्रीय स्मारक प्राधिकरणाची मंजुरी

**छत्रपती संभाजीनगर- प्रतिनिधी**

प्रसिद्ध १२ ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेल्या वेरूळ येथील श्री घृष्णेश्वर मंदिर परिसरातील सुविधा मध्ये वाढ करण्यात येत आहे. मंदिर परिसरातील नियंत्रित क्षेत्रात ( ) भाविकांच्या सोयीसाठी विविध सार्वजनिक सुविधांच्या +१ मजली भव्य बांधकामाला राष्ट्रीय स्मारक प्राधिकरणाने ()अधिकृत मंजुरी दिली आहे. सांस्कृतिक मंत्रालय, भारत सरकार अंतर्गत सक्षम प्राधिकारी कार्यालय (महाराष्ट्र राज्य, मुंबई) यांनी २५ मे २०२६ रोजी याबाबतचे अधिकृत मंजुरी पत्र ( ) निर्गमित केले आहे.

नवी दिल्ली येथे दि. २० मे २०२६ रोजी झालेल्या राष्ट्रीय स्मारक प्राधिकरणाच्या ५१९ व्या बैठकीत या महत्त्वपूर्ण प्रकल्पाला मंजुरी देण्यात आली. जिल्हाधिकारी विनय गौडा जी सी यांनी यांनी याबाबत सादरीकरण केले होते. यावेळी अपर मुख्य सचिव वेणुगोपाल रेड्डी, सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव विनोद अग्रवाल, पुरातत्त्व सर्वेक्षण विभागाचे अधीक्षक अरुण मलिक, संचालक कर्नल एस. मारवाह, महासंचालक यदुवीर रावत, जिल्हा नियोजन अधिकारी भारत वायाळ, कार्यकारी अभियंता स्मिता पवार यांची प्रमुख उपस्थिती यावेळी होती. सार्वजनिक बांधकाम (पश्चिम) विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांनी या संदर्भातील प्रस्ताव दाखल केला होता.

यात ५ हजार चौ. मीटरपेक्षा मोठे शॉपिंग कॉम्प्लेक्स आणि भव्य सभा मंडप

वेरूळ येथील गट क्र. ४ मध्ये होणाऱ्या या नियोजित प्रकल्पात भाविकांच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक असणाऱ्या पायाभूत सुविधांचा समावेश आहे. मंजूर नकाशांनुसार विविध विभागांचे चटईक्षेत्र ( ) खालीलप्रमाणे असेल,शॉपिंग कॉम्प्लेक्स, ५१३२.९१ चौ. मीटर,प्रतीक्षा कक्ष २२६५.३६ चौ. मीटर

भक्त निवास ( + १) १५३१.०२ चौ. मीटर,भव्य सभा मंडप,१२२३.६० चौ. मीटर

पायी दर्शन बारी, फूट ओव्हर ब्रिज आणि प्रवेशद्वार,७६.५० चौ. मीटर,सुरक्षा भिंत , ५२९.१८ मीटर लांबी १८५.२३ चौ. मीटर,बांधकामाची उंची व तांत्रिक अटी या बांधकामाची एकूण उंची , पॅरापेट भिंत आणि पाण्याच्या टाकीसह १३.८८ मीटर असेल, तर इमारतीची मुख्य उंची ९.११ मीटरपेक्षा जास्त नसावी असे तांत्रिक नियमांत स्पष्ट करण्यात आले आहे. स्मारकाच्या प्रतिबंधित क्षेत्रात ( ) कोणत्याही बांधकामाला सक्त मनाई असेल. तसेच, उत्खनन किंवा बांधकामादरम्यान कोणतेही पुरातत्वीय अवशेष ( )सापडल्यास काम त्वरित थांबवून त्याची माहिती भारतीय पुरातत्व सर्वेक्षणच्या () वेरूळ उप-वर्तुळ कार्यालयाला देणे बंधनकारक राहील.

प्राधिकरणाने दिलेल्या मंजुरीनुसार, प्राचीन स्मारके आणि पुरातत्व स्थळे व अवशेष कायदा, १९५८ ( ) मधील तरतुदींचे उल्लंघन झाल्यास ही परवानगी रद्द केली जाईल व कायदेशीर कारवाई केली जाईल. याशिवाय, बांधकाम सुरू करण्यापूर्वी अग्निशामक दल, स्थानिक प्रशासन आणि इतर संबंधित विभागांचे ना हरकत प्रमाणपत्र () व काम पूर्ण झाल्यावर भोगवटा प्रमाणपत्र ( ) घेणे सार्वजनिक बांधकाम विभागाला बंधनकारक करण्यात आले आहे.

या मंजुरीमुळे घृष्णेश्वर मंदिराला भेट देणाऱ्या देशभरातील लाखो भाविकांना आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सुविधा मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

## छत्रपती संभाजीनगर जालना जिल्ह्यात पोस्टर्स, बॅनर्स लावण्यास बंदी; जिल्हा दंडाधिकारी यांचे आदेश

**छत्रपती संभाजीनगर - प्रतिनिधी**

औरंगाबाद- जालना स्थानिक प्राधिकारी निवडणूक २०२६ ची आचारसंहिता लागू झाली असून, या काळात रहदारीस अडथळा ठरणारे किंवा अपघात घडू शकणारे राजकीय प्रचार साहित्य लावण्यास प्रशासनाने पूर्णपणे बंदी घातली आहे. छत्रपती संभाजीनगरचे जिल्हादंडाधिकारी विनय गौडा जी. सी. यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम ३३(१) (घक) अन्वये हे प्रतिबंधात्मक आदेश जारी केले आहेत. हे आदेश दिनांक २५ मे २०२६ पासून ते २५ जून २०२६ पर्यंत (निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत) लागू राहतील. सार्वजनिक इमारती, सार्वजनिक रस्ते आणि त्यांच्या परिसरात कोणत्याही राजकीय पक्षाला, उमेदवाराला किंवा त्यांच्या कार्यकर्त्यांना निवडणूक संबंधी पोस्टर्स, बॅनर्स, पॅम्पलेट्स, कटआऊट्स, होर्डिंग्ज, कमानी लावण्यास आणि घोषवाक्ये लिहिण्यास सक्त मनाई करण्यात आली आहे.

अशा प्रकारच्या प्रचार साहित्यामुळे सार्वजनिक वाहतुकीस अडथळा निर्माण होऊन मोठे अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी आणि आचारसंहितेचा भंग टाळण्यासाठी हे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.

पान १ वरुन

### वाढत्या पेट्रोल...

सोनवणे, दिनेश सुराणा, वसीम शेख, रघुवीर गुढे, सूरज यलगंटवार, गौतम लांडगे, हाजी आसिफ मोमीन, युनुस हुसेन शेख, चंद्रकांत रत्नपारखे, योगेश कदम, दिग्विजय धांडगे, दिलीप चव्हाण यांनी दिले व या प्रसंगी इतर मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### परतुर शहरात...

नियुक्तीपत्र नाही. सर्व शिक्षक बोगस आहेत, ना कोणत्या शिक्षकांना शिक्षणाधिकाऱ्याची ऑर्डर नाहीये ,त्यामुळे शाळेतील जे काही रेकॉर्ड आहे त्या रेकॉर्डमध्ये ज्याला वाटेल त्याप्रमाणे खाडतोड केली आहे ,या या सर्व बाबींची तपासणी व्हायलाच पाहिजे. तसेच इंग्रजी माध्यमाची शाळा म्हणजे हा एक महाराष्ट्र मध्ये पैसे कमवण्याचे साधन झाले आहे .अध्यक्ष कोण त्याचा सचिव यांच्याशी शाळेचा काहीही संबंध नाही .मग हे शाळा कोणालातरी चालवण्यासाठी देण्यात येत आहे .ना कोणत्या शाळेची ऑडिट आहे .काही शाळा तर फक्त आरटीई मुलांचे शासनाकडून पैसे मिळत आहेत म्हणून ह्या शाळा चालू आहेत. मुलांच्या नावाने बोगस पावत्या म्हणून बोगस ठराव म्हणून शासनाकडे पाठवल्या जात आहे. शासनाकडे पाठवल्यानंतर विशिष्ट वकिलाच्या मार्फत वकिलांना कमिशन देऊन आर टी इ विद्यार्थ्यांचे पैसे काढल्या जात आहेत .इंग्रजी माध्यमातील शाळेतील कुठल्याच शिक्षकांना संस्थाचालक शिक्षण अधिकारी यांच्याकडे त्यांचा प्रस्ताव पाठवा ऑर्डर घेतल्या जात नाही .म्हणजेच सर्व शिक्षक अनाधिकर्त आहेत. याकडे शासनाचे लक्षण आहे प्रत्येक वर्षी या इंग्रजी माध्यमाच्या शाळा विद्यार्थ्यांचे गणवेश बदलण्याची काम जरूर करते, कारण यांना यामागे भरपूर कमिशन मिळते हे देखील शासनाने नियंत्रित करण्याचे काम करावे अशी पालकांची विनंती आहे शासनाचे व शिक्षण मंत्र्यांचे डोळे कधी उघडतील याकडे सर्व पालकांचे लक्ष लागले आहे.

# ॲड. महेश धन्नावत यांच्या प्रयत्नांना यश, जालना ड्राय पोर्ट अखेर कार्यान्वित; मराठवाड्याच्या विकासाला नवी दिशा

**जालना । प्रतिनिधी** - तब्बल एक दशकाच्या प्रदीर्घ प्रतीक्षेनंतर आणि अनेक अडथळ्यांची शर्यत पार केल्यानंतर जालना येथील बहुचर्चित ड्राय पोर्ट (मल्टीमॉडल लॉजिस्टिक्स पार्क) अखेर कार्यान्वित झाले आहे. यामागे स्थानिक विधिज्ञ ॲड. महेश एस. धन्नावत यांचा सातत्यपूर्ण पाठपुरावा आणि केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री श्री. नितीन गडकरी यांना पाठवलेल्या कायदेशीर नोटीसचा मोठा वाटा असल्याचे मानले जात आहे. १० डिसेंबर २०२५ रोजी ॲड. धन्नावत यांनी ईमेलद्वारे पाठवलेल्या खुल्या पत्रात प्रकल्पाच्या विलंबावर तीव्र नाराजी व्यक्त करत स्थानिकांच्या, विशेषतः तरुण पिढीच्या हक्कांचा आणि भविष्याचा प्रश्न उपस्थित केला होता. त्यानंतर प्रशासकीय चक्र गतिमान झाली आणि आज, २५ मे २०२६ रोजी, जालनेकरांना ड्राय पोर्ट प्रत्यक्षात सुरू झाल्याचे दिसून येत आहे, ज्यामुळे मराठवाड्याच्या औद्योगिक आणि कृषी विकासाच्या नव्या पर्वाला सुरुवात झाली आहे.

२०१४ मध्ये घोषित आणि २०१५ मध्ये स्वतः श्री. नितीन गडकरी यांच्या हस्ते भूमिपूजन झालेल्या या प्रकल्पाकडून संपूर्ण मराठवाड्याला मोठ्या अपेक्षा होत्या. हा प्रकल्प मराठवाड्याच्या विकासासाठी गेम चेंजर ठरेल, असे भाकीत वर्तवण्यात आले होते. मात्र, त्यानंतर अनेक वर्षे केवळ घोषणा आणि उद्घाटनांचे सोहळे पार पडले, पण प्रत्यक्ष कामाला गती मिळाली नाही. लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर १२ मार्च २०२४ रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते ऑनलाइन लोकार्पण होऊनही जागेवर केवळ एक रेल्वे रूळ आणि प्लॅटफॉर्म वगळता विशेष काहीच प्रगती दिसत नव्हती. वारंवार निविदा काढून त्या रद्द होण्यामागे नेमके कोणते राजकारण आहे, असा संतप्त सवाल सर्वसामान्यांकडून विचारला जात होता.

याच पार्श्वभूमीवर, ॲड. महेश धन्नावत यांनी १० डिसेंबर २०२५ रोजी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांना एक विस्तृत आणि परखड पत्र पाठवून आपली व्यथा मांडली. या पत्रात त्यांनी प्रकल्पाच्या दिरंगाईमुळे तरुणांमध्ये पसरलेले नैराश्य, रोजगाराच्या संधींचा अभाव आणि त्यामुळे होणारे मानवाधिकारांचे हनन यांसारख्या गंभीर मुद्द्यांना हात घातला. विकासासाठी पैशाची कमतरता नाही या श्री. गडकरींच्या विधानाची आठवण करून देत, मग जालना ड्राय पोर्टसाठी निधी आणि इच्छाशक्ती का कमी पडत आहे, असा थेट प्रश्न त्यांनी उपस्थित केला. या प्रकल्पामुळे स्टील, कृषी प्रक्रिया आणि बियाणे उद्योगाला चालना मिळून हजारो तरुणांना रोजगार उपलब्ध होणार होता, परंतु दिरंगाईमुळे हे सर्व भविष्य अंधारात असल्याचे त्यांनी नमूद केले.

ॲड. धन्नावत यांनी आपल्या पत्राद्वारे केवळ व्यवस्थेतील त्रुटींवर बोट ठेवले नाही, तर प्रकल्पाच्या विलंबाची उच्चस्तरीय चौकशी करावी, कामाची निश्चित कालमर्यादा जाहीर करावी आणि स्थानिकांना रोजगाराचे ठोस आश्वासन द्यावे, अशा स्पष्ट मागण्याही केल्या होत्या. त्यांच्या या पत्रानंतर आणि सातत्यपूर्ण पाठपुराव्यानंतर प्रशासकीय पातळीवर हालचाली सुरू झाल्या. विलंबास जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याचे संकेत श्री. गडकरी यांनी दिले आणि प्रकल्पाला गती देण्यासाठी आवश्यक पावले उचलली गेली.

फेब्रुवारी २०२६ मध्ये ड्राय पोर्टच्या संचालनासाठी एका खासगी कंपनीची निवड निश्चित झाली आणि मार्च महिन्यापासून ते कार्यान्वित होईल, असे संकेत मिळाले होते. मधल्या काळात काही किरकोळ प्रशासकीय अडचणी, जसे की प्रदूषण नियंत्रण मंडळाचा ना-हरकत दाखला आणि रेल्वे संबंधित कागदपत्रांची पूर्तता यांमुळे काहीसा विलंब झाला. मार्च अखेरीस अकृषिक कराच्या थकबाकीमुळे महसूल विभागाने ड्राय पोर्ट सील करण्याची कारवाई देखील केली होती, परंतु नंतर थकीत रकमेचा भरणा झाल्यावर ते पुन्हा सुरू करण्यात आले. आज, २५ मे २०२६ रोजी, जालना ड्राय पोर्ट कार्यान्वित झाल्याने स्थानिकांमध्ये आणि विशेषतः उद्योजक व शेतकरी वर्गात आनंदाचे आणि उत्साहाचे वातावरण आहे. या प्रकल्पामुळे मराठवाड्यातील कृषी उत्पादने (कापूस, सोयाबीन, मोसंबी) आणि औद्योगिक उत्पादने थेट मुंबईतील जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्टशी (जेएनपीटी) जोडली जाऊन आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत पोहोचणार आहेत. यामुळे वाहतूक खर्चात मोठी बचत होणार असून, शेतकऱ्यांना त्यांच्या मालाला चांगला भाव मिळण्याची आणि उद्योगांना जागतिक स्तरावर स्पर्धा करण्याची संधी मिळणार आहे.

ॲड. महेश धन्नावत यांच्या एका पत्रामुळे आणि नागरिकांच्या जागरूकतेमुळे एक रखडलेला प्रकल्प कसा मार्गी लागू शकतो, याचे हे उत्तम उदाहरण आहे. त्यांच्या अथक प्रयत्नांमुळे मराठवाड्याच्या विकासाचे एक नवे प्रवेशद्वार खुले झाले आहे. या ड्राय पोर्टमुळे केवळ मालाची आयात-निर्यात सुलभ होणार नाही, तर या संपूर्ण प्रदेशाच्या आर्थिक विकासाला मोठी चालना मिळून रोजगाराच्या अगणित संधी निर्माण होतील, अशी आशा आता पल्लवित झाली आहे.

# ८९ हजार कोटींच्या गुंतवणुकीला चालना मिळणार पाच अतिविशाल प्रकल्पांना विशेष प्रोत्साहन - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## उद्योग विभाग मंत्रिमंडळ उपसमितीच्या बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मंजुरी

**मुंबई** - महाराष्ट्रात औद्योगिक गुंतवणूक, रोजगारनिर्मिती आणि आधुनिक औद्योगिक परिसंस्था विकसित करण्याच्या दृष्टीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उद्योग विभाग मंत्रिमंडळ उपसमितीच्या बैठकीत सुमारे ८९ हजार ७३१ कोटी रुपयांच्या पाच विशाल आणि अतिविशाल प्रकल्पांना विशेष प्रोत्साहन देण्याचा निर्णय घेतला. या प्रकल्पांमुळे राज्यात अंदाजे २० हजार प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगारनिर्मिती होणार असून विदर्भ, मराठवाडा, नाशिकसह राज्यातील विविध भागांमध्ये औद्योगिक विकासाला मोठी चालना मिळणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

राज्याच्या औद्योगिक धोरणानुसार सामूहिक प्रोत्साहन योजनेअंतर्गत उद्योगांना विविध सवलती व प्रोत्साहने देण्यात येतात. त्याअंतर्गत नवीन उद्योग स्थापन होऊन मोठ्या प्रमाणात गुंतवणूक आकर्षित व्हावी, रोजगार वाढावा आणि औद्योगिक परिसंस्था निर्माण व्हावी, यासाठी विशाल व अतिविशाल प्रकल्पांना विशेष सवलती देण्याबाबत निर्णय घेण्यासाठी मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळ उपसमिती स्थापन करण्यात आली आहे. या उपसमितीची बैठक मंत्रालयात पार पडली. या बैठकीस उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, उद्योगमंत्री डॉ.उदय सामंत, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, उद्योग विभागाचे प्रधान सचिव डॉ. पी.अन्बळगन, एमआयडीसीचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी.वेलारासु यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

मंत्रिमंडळ उपसमितीच्या बैठकीत कोल गॅसिफिकेशन ॲण्ड डाऊनस्ट्रीम डेरीव्हेटिव्हज, सोलर सेल मॉड्युल, इग्नॉट, वेफर्स पॅनेल, इलेक्ट्रिक स्टील, पेट टायर कॉर्ड तसेच सिंथेटिक ग्रॅफाइट ॲनोड मटेरियल यांसारख्या उच्च तंत्रज्ञानाधारित आणि भविष्यकालीन उद्योग क्षेत्रांतील पाच प्रकल्पांना विशेष प्रोत्साहन देण्यास मुख्यमंत्री फडणवीस यांनी मान्यता दिली. या सर्व प्रकल्पांमुळे राज्यात उच्च तंत्रज्ञानाधारित उत्पादन क्षेत्राचा विस्तार होण्यास मदत होणार आहे.

या विशाल प्रकल्पांमुळे केवळ गुंतवणूक आणि रोजगारनिर्मितीच वाढणार नाही, तर स्थानिक स्तरावर व्यावसायिक उपक्रम, पूरक उद्योग आणि पुरवठा साखळीही विकसित होणार आहे. तांत्रिक नवकल्पना, संशोधन व विकासाला चालना मिळून लघु व मध्यम उद्योगांना नव्या संधी उपलब्ध होणार आहेत. तसेच स्थानिक युवकांसाठी प्रशिक्षण व कौशल्य विकासाच्या संधी निर्माण होऊन उदयोन्मुख तंत्रज्ञान क्षेत्रातील रोजगारक्षमता वाढण्यास मदत होणार आहे.

# प्राण्यांची अवैध वाहतूक रोखण्यासाठी चेकपोस्टवर भरारी पथकांनी तपासणी करावी-जिल्हाधिकारी विनय गौडा जी .सी

## कत्तलखान्यास भेट देऊन अहवाल सादर करण्याचे निर्देश

**छत्रपती संभाजीनगर - प्रतिनिधी**

प्राण्यांचे अवैध वाहतूक रोखण्यासाठी शहरी आणि ग्रामीण भागात चेकपोस्ट तयार करावेत ,या चेक पोस्टवर भरारी पथकाद्वारे तपासणी करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी यांनी दिले. पोलीस विभाग, पशुसंवर्धन, प्रदूषण नियंत्रण महामंडळ, परिवहन, महसूल आणि महानगरपालिका विभागाच्या अधिकारी यांच्यामार्फत संयुक्त कार्यवाही करावी, तसेच शासन मान्यताप्राप्त कत्तलखान्यामध्ये अचानक भेट देऊन तेथील कामकाज, स्वच्छता व इतर बाबी विषयी अहवाल सादर करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी यांनी दिले

जिल्हाधिकारी कार्यालयात 'जिल्हा प्राणी क्लेश प्रतिबंधक समिती'च्या () आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. बैठकीस मा.न्यायधीश( परिविक्षाधीन) गायत्री रांझे, जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. नानासाहेब कदम अतिरिक्त पोलिस आयुक्त, अशोक राजपूत, पोलीस निरीक्षक, एस. व्ही शहाणे ,उपप्रादेशिक परिवहन अधिकारी राजकुमार कुंथले, उप शिक्षणाधिकारी श्रीमती गीता तांदळे, डॉ .रमण इंगळे, सहायक आयुक्त पशुसंवर्धन

डॉ.अहेमद असरार,सहायक आयुक्त पशुसंवर्धन ,डॉ. शाहेद ,मुख्य पशुसंवर्धन अधिकारी महानगर पालिका डॉ. ज्ञानेश्वर बिडाईत सहायक पशुधन विकास अधिकारी जिल्हा परिषद,डॉ जाधव, पशुवैद्यकीय अधिकारी महानगर पालिका यांची उपस्थिती होती.

बाजाराच्या ठिकाणी किंवा इतरत्र होणारी प्राण्यांची अवैध केलेली वाहतूक पूर्णपणे रोखण्यासाठी ठिकठिकाणी पोलीस तपासणी नाके ( ) अधिक सतर्क करण्यात यावीत. शाळा, महाविद्यालये आणि सार्वजनिक ठिकाणी प्राण्यांबद्दल संवेदनशीलता निर्माण करण्यासाठी वनविभाग व प्राणी मित्र संघटनांच्या माध्यमातून विशेष जनजागृती मोहीम राबविण्याचे निर्देश जिल्हाधिकारी विनय गौडा यांनी दिले. प्राणी क्लेश प्रतिबंधक कायद्याची जिल्ह्यात प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी पोलीस, महसूल, पशुसंवर्धन विभाग आणि स्वयंसेवी संस्थांनी () समन्वय ठेवून काम करावे, असे आवाहन करण्यात आले.

RNI No. MAHBIL/2009/37831

## महाराष्ट्र शासन राजपत्र

**असाधारण भाग चार-ब**

वर्ष १२, अंक ६९ | सोमवार, मे ११, २०२६/वैशाख २१, शके १९४८ | पृष्ठे ४९, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक २३४**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**

**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### सार्वजनिक बांधकाम विभाग

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई ४०००३२, दिनांक ११ मे २०२६.

### अधिसूचना

**महाराष्ट्र महामार्ग अधिनियम**

क्रमांक खाक्षेस-२०२१/प्र.क्र.२८८/एल.बी.१/भाग-२/जालना/रस्ते-८. - ज्याअर्थी, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्यादित हे महाराष्ट्र महामार्ग अधिनियम (१९५५ चा ५५) याच्या कलम ४ च्या परंतुकाच्या तरतुदीं अनुसार (यात यापुढे ज्याचा निर्देश ''उक्त अधिनियम'' असा करण्यात आला आहे) हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्गास जोडणारा जालना ते नांदेड द्रुतगतीमार्ग म्हणून ओळखल्या जाणाऱ्या राज्य महामार्ग (विशेष) क्र. २ (अ) यासाठी (यात यापुढे ज्याचा निर्देश ''उक्त महामार्ग'' असा करण्यात आला आहे) महामार्ग प्राधिकरण आहे;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्यादित महामार्ग प्राधिकरणाने उक्त महामार्गाच्या संदर्भात महामार्ग प्राधिकरण म्हणून महाराष्ट्र शासनाला विनंती केली आहे की, यासोबत जोडलेल्या अनुसूचीत उल्लेखित जमीन (यात यापुढे जिचा निर्देश ''उक्त जमीन'' असा करण्यात आला आहे) उक्त महामार्गाचे बांधकाम, देखभाल, व्यवस्थापन किंवा कार्यान्वयन यासाठी आवश्यक एक सार्वजनिक प्रयोजन म्हणून उक्त अधिनियमाच्या तरतुदी अंतर्गत उक्त महामार्ग प्राधिकरणासाठी, महाराष्ट्र शासनाकडून अधिग्रहित करण्यात येईल;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाची खात्री पटली आहे की, एका सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीन ही उक्त महामार्गाचे किंवा त्याच्या काही भागाचे बांधकाम, देखभाल, व्यवस्थापन किंवा कार्यान्वयन यासाठी आवश्यक आहे आणि म्हणून उक्त महामार्ग प्राधिकरणासाठी, पूर्वोक्त प्रयोजनांकरिता, उक्त जमीन संपादित करणे शासनास इष्ट वाटते;

त्याअर्थी, आता, महाराष्ट्र महामार्ग अधिनियम, १९५५ (१९५५ चा ५५) याच्या कलम १५ च्या पोट-कलम (२) व (३) व कलम १७ द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा, आणि याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे, -

(एक) उक्त महामार्गाचे बांधकाम, देखभाल, व्यवस्थापन किंवा कार्यान्वयन करणे यासाठी उक्त महामार्ग प्राधिकरणासाठी उक्त जमिनीचे संपादन करण्याची घोषणा करीत आहे:

(दोन) विनिर्दिष्ट करीत आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ७ अंतर्गत निर्गमित केलेल्या अधिसूचनेला प्रतिसाद म्हणून ज्यांच्या हरकती व सूचना यापूर्वीच विचारात घेतल्या आहेत किंवा महामार्ग प्राधिकरणाकडून सुनावणी झाली आहे अशा व्यक्तींखेरीज उक्त जमिनीशी हितसंबंधित कोणतीही व्यक्ती, ही अधिसूचना **महाराष्ट्र शासन राजपत्रात** प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून एकवीस दिवसांच्या आत संबंधित भूसंपादन अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, जालना, जिल्हा जालना यांच्याकडे उक्त महामार्गाचे बांधकाम, देखभाल, व्यवस्थापन किंवा कार्यान्वयन यासाठीच्या प्रयोजनांसाठी उक्त जमिनीच्या वापराबाबत लेखी व त्याच्या कारणांसह आक्षेप घेऊ शकते.

### अनुसूची

संपादित करावयासाठी उद्देशित असलेल्या जमिनीचे वर्णन

**तालुका : जालना** — **जिल्हा जालना**

| अ.क्र. | गाव | भूमापन क्रमांक/ गट क्रमांक | क्षेत्र (हेक्टर आर) |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १. | श्रीकृष्णनगर | ७९ | ०.८१.१३ |
| २. | श्रीकृष्णनगर | ८१ | ०.४२.८७ |
| ३. | श्रीकृष्णनगर | ८२ | ०.०७.९२ |
| ४. | श्रीकृष्णनगर | ८३ | ०.११.२० |
| ५. | श्रीकृष्णनगर | ८४ | ०.०५.३५ |
| ६. | श्रीकृष्णनगर | ९३ | ०.१२.६२ |
| ७. | श्रीकृष्णनगर | ९४ | ०.०७.७१ |
| ८. | श्रीकृष्णनगर | ९५ | ०.०६.९५ |
| ९. | श्रीकृष्णनगर | ९६ | ०.०४.९० |
| १०. | श्रीकृष्णनगर | ९७ | ०.०४.७५ |
| ११. | श्रीकृष्णनगर | ९९ | ०.०४.३७ |
| १२. | श्रीकृष्णनगर | १०७ | ४.०१.५० |
| १३. | श्रीकृष्णनगर | १०८ | २.७५.२१ |
| १४. | श्रीकृष्णनगर | १०९ | १.५६.७४ |
| १५. | श्रीकृष्णनगर | ११० | ०.४५.६६ |
| १६. | श्रीकृष्णनगर | रस्ता | ४.३८.६५ |
| १७. | श्रीकृष्णनगर | १०६ | ०.०१.२५ |
| १८. | पानशेंद्रा | १४७ | ०.०२.९४ |
| १९. | पानशेंद्रा | १५६ | ०.२२.३१ |
| २०. | पानशेंद्रा | १५९ | ०.२०.५१ |
| २१. | पानशेंद्रा | १६० | ०.०४.१९ |
| २२. | पानशेंद्रा | १६१ | ०.१२.४९ |
| २३. | पानशेंद्रा | १६३ | ०.०८.६९ |
| २४. | पानशेंद्रा | १६४ | ०.५०.९५ |
| २५. | पानशेंद्रा | १८३ | ०.३१.०१ |
| २६. | पानशेंद्रा | १८४ | ०.०६.३९ |
| २७. | पानशेंद्रा | १८५ | ०.०५.५१ |
| २८. | पानशेंद्रा | १८७ | ०.१६.४७ |
| २९. | पानशेंद्रा | कॅनॉल | ०.०७.४८ |
| ३०. | पानशेंद्रा | २१० | १.३१.४१ |
| ३१. | पानशेंद्रा | २११ | १.४२.४२ |
| ३२. | पानशेंद्रा | २१२ | ०.४४.०१ |
| ३३. | पानशेंद्रा | २१३ | ०.३९.७९ |
| ३४. | पानशेंद्रा | २१४ | ०.६६.५० |
| ३५. | पानशेंद्रा | २१५ | ०.६३.४४ |
| ३६. | पानशेंद्रा | २१६ | ०.३६.३६ |
| ३७. | पानशेंद्रा | २१७ | ०.१९.०२ |
| ३८. | पानशेंद्रा | २१८ | ०.४७.१० |
| ३९. | पानशेंद्रा | २१९ | १.८१.११ |
| ४०. | पानशेंद्रा | २२१ | ०.०१.८८ |
| ४१. | पानशेंद्रा | २२३ | ०.०१.८० |
| ४२. | पानशेंद्रा | २२४ | ०.११.६२ |
| ४३. | पानशेंद्रा | २०५ | ०.५६.८२ |
| ४४. | पानशेंद्रा | २२० | ०.००.१२ |
| ४५. | पानशेंद्रा | ९ | ०.१२.१५ |
| ४६. | राममुर्ती | ११६ | ३.३०.५० |
| ४७. | राममुर्ती | १३१ | ०.१५.२५ |
| ४८. | राममुर्ती | १३२ | ०.५७.७७ |
| ४९. | राममुर्ती | १३३ | १.४५.५६ |
| ५०. | राममुर्ती | १३४ | ०.२५.६५ |
| ५१. | राममुर्ती | १४० | ०.०७.७७ |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**संदीप खलाटे,**

शासनाचे उप सचिव.

जा.क्र. जिमाका/जा/जाहि/२०२६/दिनांक २५ मे २०२६

# डिझेल पेट्रोल टंचाई मुळे मिरची उत्पादक शेतकरी प्रचंड तणावात!

## सरकारने व्यापाऱ्यांना सवलत देवुन किं वा हमीभावाने हिरवी मिरची खरेदी करून निर्यात करण्याचे नियोजन करावे!

**जालना- दत्ता देशमुख)**
जालना जिल्ह्यातील भोकरदन परिसर हा मिरची पिकासाठी प्रसिद्ध आहे. येथील शेतकरी ४५ ते ४८ तापमानात, एप्रिल-मे च्या रखरखत्या उन्हात राबतो.आलेला माल विक्रि होईल का नाही डिझेल पेट्रोल टंचाई मुळे भोकरदन तालुक्यातील मिरची उत्पादक शेतकरी प्रचंड तणावात!एक एकर हिरवी मिरची उभी करण्यासाठी आज शेतकऱ्याला *जवळपास १ लाख रुपये खर्च येतो.
खर्चाचा ताळेबंद
१. रोपे १५,००० ते २०,००० रु.
२. बेड, मल्चिंग, ठिबक २५,००० रु.
३. मशागत, खते, औषधे ३०,००० रु.
४. मजुरी, खुरपणी, तोडणी २०,००० रु.
५. डिझेल-पेट्रोल : टंचाईमुळे तोडणीचा दर वाहतूक खर्च वाढला.
आजची परिस्थिची खर्च तर करुन बसलो.डिझेल-पेट्रोल टंचाईमुळे वाहतूक ठप्प आहे. व्यापारी बांधावर यायला तयार नाहीत. खर्च वजा जाता बाजारात सरासरी किमान ५० रु. किलोने विक्री होईल अशी शेतकऱ्यांना अपेक्षा आहे. व्यापाऱ्यांनी मिरची खरेदि केली नाही तर माल पडुन राहण्याची भाव कमी होण्याची भीती आहे. अन्यथा शेतात उभी असलेली हिरवी मिरची लाल होऊन वाया जाणार! शेतकऱ्याने कर्ज काढून, सोने गहाण ठेवून लावलेला १ लाख रुपये एकराचा खर्च कसा निघणार?
शेतकऱ्यांचा माल योग्य दराने विक्री होण्यासाठी सरकारने लक्ष देण्याची गरज आहे.''दुनिया इकडे तिकडे झाली तरी चालेल, पण *शेतकऱ्याचा माल पडून राहिला नाही पाहिजे.*'' सरकारकडे यावर सोल्युशन काय आहे?
१. हमीभावाने खरेदी सुरू करा : हिरव्या मिरचीला किमान ५० रु./किलो हमीभाव जाहीर करून नाफेड/महाएफपीसी मार्फत थेट खरेदी सुरू करा. भोकरदन, जाफराबाद येथे खरेदी केंद्र तात्काळ सुरू करा. शेतकरी उत्पादक कंपन्यांची अनुदानावर सेवा घ्या!
२. निर्यातीसाठी विशेष व्यवस्था : महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाने हिरवी मिरची आखाती देश, युरोप येथे निर्यात करण्यासाठी एअर कार्गो सबसिडी द्यावी. शेतमाल सडू देण्यापेक्षा परदेशी पाठवून डॉलर कमवा. ३. डिझेल-पेट्रोल पुरवठा सुरळीत करा : शेतमाल वाहतुकीसाठी कृषी कार्डावर सवलतीच्या दरात डिझेल उपलब्ध करून द्या. टँकरने प्रत्येक गावात तालुक्यात पुरवठा करा. ४. पीक विमा व कर्जमाफी : अवकाळी पाऊस डिझेल टंचाईमुळे नुकसान झाल्यास मिरची उत्पादकाला हेक्टरी ५०,००० रु. मदत जाहीर करा. पीक कर्जाचे व्याज माफ करा. ५. प्रक्रिया उद्योग उभारा : भोकरदन मध्ये मिरची पावडर, सॉस, लोणचे युनिट उभारण्यासाठी १००% अनुदान द्या. शेतकरी उत्पादक कंपन्यांना प्राधान्य द्या. शेतकरी जगाचा पोशिंदा आहे, त्याला भिकारी करू नका. आज जर डिझेल टंचाईमुळे व्यापाऱ्यांनी मिरची खरेदी केली नाही आणि सरकारी पातळीवरून मिरची खरेदी साठी उपाय योजना झाली नाही, तर कर्जबाजारी शेतकऱ्याला आत्महत्येशिवाय पर्याय उरणार नाही.भोकरदनच्या पुढाऱ्यांनी व्यापारी नियमीत येण्यासाठी मध्यस्थी व उपाय करावा. आम्ही नेत्यांची हुजरेगिरी करत नाही, आम्ही जाब विचारतो.वेळीच उपाय करा नुकसान झाल्यावर भोकरदनचा शेतकरी पेटून उठला तर त्याची धग मंत्रालयापर्यंत पोहोचेल.

## प्राणी व पशु पक्षांसाठी, झाडावर, जमिनीवर पाणी साठवण करा -दुर्गेश बनकर

**दत्ता देशमुख**
दिवसेंदिवस उन्हाचा ताप वाढत चालला आहे. दुपारच्या वेळेस माणूस सुद्धा घराबाहेर पडायला घाबरतो, तर छोट्या पक्ष्यांची अवस्था काय होत असेल याचा विचार करणं सुद्धा गरजेचं आहे. पाण्याअभावी अनेक पक्षी जीव गमावत आहेत. झाडं कमी झाली, पाणवठे आटले आणि आता हे मुक्या जीवांचं जगणं कठीण होत चाललं आहे.
याच गोष्टीची जाणीव ठेवत मार्फत वेळोवेळी पक्षांसाठी पाणी ठेवण्याचे आवाहन करण्यात येत असते.
महाराष्ट्रभर अनेक ठिकाणी पक्ष्यांसाठी पाण्याची भांडी ठेवण्याचा उपक्रम सध्या सुरू असून अनेक सामाजिक कार्यकर्ते यात सहभागी



होत आहेत. टेंभुर्णी शहर येथे देखील सेवानिवृत्त मा. मुख्यधापक रुस्तुम बोर्डे सर आणि दुर्गेश बनकर यांच्या पुढाकारातून पक्षांसाठी विविध ठिकाणी पाण्याची भांडी ठेवण्यात आली. उन्हामुळे त्रस्त झालेल्या पक्ष्यांना थोडासा आधार मिळावा आणि समाजामध्ये देखील याबाबत जनजागृती व्हावी हा या उपक्रमामागचा उद्देश आहे.
''माणसाला तहान लागली तर तो बोलतो पण पक्षी काही बोलू शकत नाहीत. म्हणून त्यांच्या गरजेची जाणीव आपण स्वतः ठेवली पाहिजे.'
'सर्व नागरिकांना विनंती करण्यात येत आहे की, आपल्या घरासमोर, गच्चीवर, शेतात, दुकानाजवळ किंवा झाडाखाली एक तरी पाण्याचं भांडं ठेवावं. दररोज त्यामध्ये स्वच्छ पाणी भरावं. छोटासा हा प्रयत्न अनेक पक्ष्यांसाठी जीवदान ठरू शकतो.
निसर्ग आपल्यासाठी खूप काही देतो, आता त्याच्यासाठी आपण थोडंसं करणं हीच खरी माणुसकी आहे.

## पाणीवेस ते राजमहेल टॉकीज परिसरातील १९ अतिक्रमणे जमीनदोस्त; जालना मनपाची धडक कारवाई

**जालना - प्रतिनिधी**
पावसाळा तोंडावर आलेला असताना जालना शहर महानगरपालिकेने शहरातील अनधिकृत बांधकामे आणि रस्ते-नाल्यांवरील अडथळ्यांविरोधात जोरदार मोहीम उघडली आहे. मनपा आयुक्त अंजली शर्मा यांच्या आदेशानुसार आणि सहाय्यक आयुक्त विजय फुलंब्रीकर यांच्या थेट मार्गदर्शनाखाली आज, मंगळवार दि. २६ मे रोजी शहरात धडक अतिक्रमण विरोधी मोहीम राबविण्यात आली. या अत्यंत वेगवान कारवाईत पाणीवेस ते राजमहेल टॉकीज परिसरातील मुख्य रस्ता आणि नाल्यांवर ठाण मांडून बसलेली तब्बल १९ मोठी अतिक्रमणे हटवण्यात आली. या धडक कारवाईमुळे संबंधित परिसरातील अतिक्रमणधारकांचे धाबे दणाणले असून, मुख्य रस्त्याने मोकळा श्वास घेतला आहे.
जेसीबी आणि टिप्परच्या साहाय्याने कारवाई; ओटे, शेड्स भुईसपाट पाणीवेस ते राजमहेल टॉकीज हा परिसरातील अत्यंत गजबजलेला आणि वाहतुकीचा मुख्य मार्ग मानला जातो. या मार्गावर अनेक दुकानदार आणि स्थानिक नागरिकांनी रस्त्याच्या कडेला आणि दुकानांसमोर अनधिकृतपणे पक्के ओटे, पायऱ्या आणि लोखंडी तसेच पत्र्यांचे शेड्स उभारले होते. यामुळे पादचाऱ्यांना चालणे मुश्कील झाले होते आणि वाहतुकीचा मोठा खोळंबा होत होता.
आज सकाळी मनपाचे पथक फौजफाट्यासह या परिसरात दाखल झाले. कोणतीही गय न करता १ जेसीबी () आणि १ टिप्परच्या साहाय्याने हे अनधिकृत ओटे, पायऱ्या आणि शेड्स तोडून टाकण्यात आले. तसेच रस्त्यालगतच्या नाल्यांवर केलेले अतिक्रमण काढून नाले पूर्णपणे मोकळे करण्यात आले. संभाव्य कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न लक्षात घेता या कारवाई दरम्यान पोलीस पथकाचा चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता, ज्यामुळे मोहीम विनाअडथळा आणि जलद गतीने पार पडली.
मनपाचे हे अधिकारी आणि कर्मचारी रणमैदानात
अतिक्रमण विभागाचे प्रमुख श्री. बी. सी. राठोड यांच्या थेट नेतृत्वाखाली ही कारवाई करण्यात आली. मोहिमेत मनपाच्या खालील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सक्रिय सहभाग नोंदवला: श्री. शामसन कसबे (सहाय्यक) श्री. अमजद खान (लिपिक तथा स्वच्छता निरीक्षक)
श्री. अजय पेम्बर्ती (लिपिक)
श्री. शेख कादर (लिपिक)
श्री. आमेर खान (लिपिक)
तसेच स्वच्छता विभागातील १० ते १२ सफाई कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी तत्परतेने काम केले.
पावसाळा पूर्व तयारी: मनपाचा कडक इशारा
''सध्या पावसाळी वातावरण सुरू झाले आहे.

## मनसेच्या निवेदनाला यश ; जाफ्राबाद पंचायत समितीला अखेर गटविकास अधिकारी

**(दत्ता देशमुख)**
जाफ्राबाद पंचायत समितीमध्ये गेल्या अनेक दिवसांपासून गटविकास अधिकारी पद रिक्त असल्याने तालुक्यातील ग्रामीण विकासाच्या कामांवर परिणाम होत होता. विविध विकासकामे, ग्रामपंचायतींचे प्रशासकीय प्रश्न तसेच नागरिकांची कामे रखडल्यामुळे ग्रामस्थांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले होते.
या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे तालुका सरचिटणीस पंढरीनाथ म्हस्के यांनी पंचायत समिती कार्यालयात आंदोलनात्मक पवित्रा घेत गटविकास अधिकाऱ्यांच्या रिकाम्या खुर्चीला हार घालून प्रशासनाचा निषेध व्यक्त केला होता.



तसेच येत्या आठ दिवसांत गटविकास अधिकारी रुजू न झाल्यास मनसेच्या वतीने ''खळखट्याक आंदोलन'' करण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला होता.
मनसेच्या या आक्रमक भूमिकेनंतर प्रशासनाने दखल घेत जाफ्राबाद पंचायत समितीस गटविकास अधिकारी उपलब्ध करून दिल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे रखडलेली प्रशासकीय कामे मार्गी लागण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.
दरम्यान, तालुक्यातील ग्रामस्थांनी मनसेच्या पाठपुराव्याबद्दल समाधान व्यक्त करत महाराष्ट्र नवनिर्माण सेना व पदाधिकाऱ्यांचे आभार मानले आहेत.

## निवडणूक आचारसंहितेमुळे जिल्हास्तरीय लोकशाही दिन स्थगित

जालना - प्रतिनिधी
महाराष्ट्र विधान परिषदेच्या द्विवार्षिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर लागू करण्यात आलेल्या आदर्श आचारसंहितेमुळे जिल्ह्यात दर महिन्याच्या पहिल्या सोमवारी आयोजित करण्यात येणारा जिल्हास्तरीय लोकशाही दिन पुढील आदेशापर्यंत आयोजित करण्यात येणार नसल्याची माहिती जिल्हाधिकारी कार्यालयाकडून देण्यात आली आहे. भारत निवडणूक आयोग, नवी दिल्ली यांनी दि. १८ मे २०२६ रोजी जारी केलेल्या पत्रानुसार महाराष्ट्र विधान परिषदेच्या द्विवार्षिक निवडणुकीसाठी आदर्श आचारसंहिता दि. १८ मे २०२६ पासून लागू करण्यात आली आहे. ही आचारसंहिता निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत, म्हणजेच दि. २५ जून २०२६ पर्यंत प्रभावी राहणार आहे.
शासनाच्या दि. २६ सप्टेंबर २०१२ च्या परिपत्रकातील परिच्छेद क्र. ५.७ नुसार, निवडणुकीचे वेळापत्रक जाहीर झाल्यानंतर आणि निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत लोकशाही दिनाचे आयोजन करता येत नाही. त्या अनुषंगाने जालना जिल्ह्यात दर महिन्याच्या पहिल्या सोमवारी होणारा जिल्हास्तरीय लोकशाही दिन या कालावधीत स्थगित ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याचे जिल्हाधिकारी कार्यालयाने कळविले आहे.



मुंबई येथे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री.देवेंद्रजी फडणवीस यांची भेट घेऊन छत्रपती संभाजीनगर-जालना स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाची जागा भारतीय जनता पक्षाला सोडण्यात यावी, अशी मागणी भाजपाच्या शिष्टमंडळाने केली.
यावेळी मंत्री अतुल सावे , आ. नारायण कुचे, आ. प्रशांत बंब, मा. आ. संजय केनेकर, भाजपा जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे, उपमहापौर राजेश राऊत, स्थायी समिती सभापती अशोक पांगारकर, बसवराज मंगरुळे, बापू घडामोडे आदी उपस्थित होते.

# उत्पादन खर्च दुप्पट झाल्याने बळीराजा आक्रमक, हमीभावाने शेतकऱ्यांचा माल विकत घेणे, कृषी कर्जाची व्यवस्था निर्माण करणे, गरजेचे

**(दत्ता देशमुख)**
ऐन खरीप हंगामात शेतकरी पेरणीच्या तयारीला लागला असतानाच बियाणे आणि रासायनिक खतांच्या किमतीत भरमसाठ वाढ झाली आहे. यामुळे जगाच्या पोशिंद्यावर थेट आर्थिक संकट कोसळले असून शेतकऱ्यांपुढे पेरा की मरा असा यक्षप्रश्न उभा राहिला आहे. जाफ्राबाद तालुक्यातील कृषी सेवा केंद्रात गेलेल्या शेतकऱ्यांना गेल्यावर्षपिक्षा ३० ते ४० टक्के जास्त दर ऐकून घाम फुटला असून बळीराजा पुरता हवालदिल झाला आहे.
खतांची लूटमार
बाजारपेठेत खतांचा काळाबाजार सुरू असल्याचा आरोप होत असून डीएपी खताची गोणी १३५० रुपयांवरून थेट १९०० रुपयांवर पोहोचली आहे. युरिया, पोटॅश, सुपर फॉस्फेटच्या प्रत्येक गोणीमागे ४०० ते ६०० रुपयांची दरवाढ झाली आहे. बियाण्यांचे
**शेतकऱ्यांच्या हिताची निर्णय व्हावे**
''यंदाच्या वर्षी खरीप हंगामातील मशागत करून पेरणीसाठी लगबग सुरू असताना कृषी सेवा दुकानात बियाणे रासायनिक खतांच्या किमती ऐकून धक्का बसला. सरकारने आमच्याही मालाला योग्य भाव जाहीर करावा., नाफेडचे तसेच सरकारी खरेदी केंद्र सर्वच ठिकाणी सुरू करावे, जेणेकरून शेतकऱ्यांच्या खर्च कमी लागेल, हमीभावापेक्षा कमी खर्चामध्ये शेतकऱ्यांचा म** घेऊ नये व तात्काळ रक्कम उपलब्ध करून देण्याची वाजता शेतकऱ्यांच्या दृष्टीने सरकारने करणे गरजेचे आहे
रमेशराव खरात : शेतकरी शेतकरी, हितचिंतक,
**जास्त भावाने विक्री करू नये**
''सर्व कृषी सेवा केंद्राने बी बियाणे खतांच्या किमती वाढू नये, शेतकरी मेटाकुटीला येईल अशी स्थिती निर्माण करू नये, अशी शेतकऱ्यांच्या वतीने सर्व कृषी केंद्रांना विनंती करतो आहे.
विश्वनाथ सांगोळे -- शेतकरी
भावही गगनाला भिडले असून सोयाबीनच्या एका बॅगची किंमत ४५०० रुपयांवरून ६००० रुपयांच्या पार गेली आहे. कापसाचे बियाणे ८०० रुपयांवरून १२०० रुपयांवर गेले असून बीटीच्या नावाखाली लूटमार सुरू असल्याचे शेतकरी सांगत आहेत. खर्च दुप्पट झाला असताना



मालाला मात्र निम्मा भाव मिळत आहे. शेतकऱ्याच्या घरातून कापूस, सोयाबीन, तूर, मका निघाला की व्यापारी मातीमोल भावाने खरेदी करतो आणि तोच माल व्यापाऱ्याच्या गोदामात जाताच दरात
शेतकऱ्यांच्या हिताचा
हमीभाव जाहीर होणे गरजेचे
''केंद्र सरकारने व महाराष्ट्र सरकारने कापूस, मका, सोयाबीन आदी पिकांचा शेतकऱ्यांच्या हिताचा हमीभाव जाहीर करून आदेशित करावे जेणेकरून शेतकऱ्यांना दिलासा मिळणार. यावर्षी सगळ्याच गोष्टींची भरमसाठ महागाई वाढली. डिझेल, शेत नांगरणी, मशागत, मजुरी, यामध्ये वाढ झाली आहे. या सर्व गोष्टींचा सरकारने विचार करून योग्य हमीभाव जाहीर करणे गरजेचे आहे. शेतकरी मेटाकुटीला आलेला असताना सरकारने त्यांच्या बाजूने उभे राहून, शेतकरी कर्जमाफी शेतकऱ्यांसाठी बँकातून जास्त कर्ज मंजुरी, याकडे लक्ष दिले पाहिजे.
- संतोष आवटी

थट्टा आहे. मोठी वाढ होते, ही शेतकऱ्यांची थेट
हमीभावाची मागणी
खत-बियाण्यांचे भाव वाढवता, मग आमच्या मालाला हमीभाव का देत नाही, असा सवाल शेतकरी उपस्थित करत आहेत. मजुरी ५०० रुपये रोज झाली असून डिझेल ११० रुपये लिटर झाले आहे. अशा स्थितीत कापूस ५००० रुपये क्विंटल आणि सोयाबीन ४००० रुपये क्विंटल का, असा थेट प्रश्न विचारला जात आहे. या वाढत्या महागाईमुळे मुलांचे शिक्षण आणि लग्न कसे करायचे, असा चिंताजनक प्रश्न शेतकऱ्यांसमोर आहे. यावर तातडीने उपाययोजना म्हणून कापसाला ९५००, सोयाबीनला ७५००, तुरीला ९००० आणि मक्याला ३००० रुपये हमीभाव देण्याची मागणी केली जात आहे. तसेच कृषी सेवा केंद्रांमधील कंपन्यांची नफेखोरी रोखून सबसिडी वाढवावी आणि बाजार समित्यांमधील दलाली बंद करून शेतकऱ्यांना थेट माल विकू द्यावा, अशी मागणी होत आहे. बळीराजाला देशोधडीला लावल्यास सत्ता उलथवून लावू, असा इशारा देण्यात आला आहे.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.